


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २११ • बुधवार दि.२० मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## पंतप्रधान मोदी-गृहमंत्री अमित शहा गद्दार राहुल गांधींचा घणाघाती आरोप

रायबरेली:पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि आरएसएसने देशाला विकण्याचे काम केले आहे. शहा व मोदी गद्दार आहेत असा घणाघाती आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज रायबरेलीत आयोजित एका सभेत बोलतांना केला.



रायबरेलीतील आज बुधवारी लोधवारी गावात आयोजित बहुजन स्वाभिमान सभेत बोलत होते. सभेत बोलताना राहुल गांधी म्हणाले, जेव्हा आरएसएसचे कार्यकर्ते तुमच्यासमोर येतील, तेव्हा त्यांना स्पष्टपणे सांगा की तुमचे पंतप्रधान, गृहमंत्री आणि संघटना गद्दार आहेत. त्यांनी देश विकण्याचे काम केले आहे. त्यांनी पुढे आरोप केला की, देशातील लोकशाही आणि संविधान धोक्यात आले असून, त्यासाठी नरेंद्र मोदी, अमित शाह आणि आरएसएस जबाबदार आहेत.देशासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहत असल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. आता आर्थिक वादळ येणार आहे. मोदी तुम्हाला वाचवू शकणार नाहीत. कोविड काळात आणि नोटाबंदीच्या वेळी जसे ते भावनिक होत टीव्हीवर दिसले होते, तसेच ते पुन्हा हात जोडून म्हणतील की ही माझी चूक नाही, असा टोला त्यांनी लगावला.लोकसभा निवडणुकीनंतर राहुल गांधी यांची रायबरेलीला ही सातवी भेट आहे. यापूर्वी त्यांनी १९ जानेवारी २०२६ रोजी येथे दौरा केला होता. राजकीय विश्लेषकांच्या मते, आगामी २०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने रायबरेली आणि अमेठीमध्ये राजकीय हालचाली वाढवल्या आहेत.दोन दिवसांच्या उत्तर प्रदेश दौऱ्यावर आलेल्या राहुल गांधी यांनी बुधवारी गेस्ट हाऊसमध्ये कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी लोधवारी गावात स्वातंत्र्यसैनिकाच्या पुतळ्याचे अनावरण पान ४ वर

## नीट पेपरफुटी प्रकरणी नांदेडमध्ये आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-नीट परीक्षेतील कथीत पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धमेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा व इतर मागण्यांसाठी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज (बुधवार) दि.२० मे रोजी धरणे आंदोलन करण्यात आले आहे.




नांदेड जिल्हा विद्यार्थी कृती समितीने निवेदनात म्हटले आहे की, नीट परीक्षा ही देशातील वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी अत्यंत महत्वाची परीक्षा असून तीच्या पारदर्शकतेवर देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून आहे. मात्र पेपरफुटीच्या सतत समोर येणाऱ्या घटनांमुळे मेहनती विद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या जात आहेत. पेपरफुटी प्रकरणामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास गंभीरपणे हादरला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणातील चौकशी रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार, दलालांचे जाळे आणि संस्थात्मक निष्काळजीपणा समोर येत आहे. पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंग यांच्यावर प्रशासकीय जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. पेपरफुटी प्रकरणामुळे निर्माण झालेल्या मानसीक तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणांची गंभीर दखल घेवून संबंधीत जबाबदार व्यक्तींवर कायदेशिर कार्यवाही करावी व इतर पान ४ वर

## आंदेकर हत्या प्रकरणातील आरोपीच्या भावाची हत्या;गोळीबाराने शहर हादरले

पुणे:गेल्या काही वर्षांपासून चर्चेत असलेले पुण्यातील टोळीयुद्ध पुन्हा एकदा उफाळून आल्याचे चित्र समोर आले आहे. शहरातील बालाजीनगर परिसरात शुक्रवारी रात्री झालेल्या गोळीबारात एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आंदेकर-कोमकर गँगवॉर पुन्हा भडकली असल्याची चर्चा रंगू लागली आहे.जुन्या वादातून हा हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असली तरी या घटनेला आंदेकर टोळी आणि कोमकर गटातील वैमनस्याची पार्श्वभूमी असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. मृत व्यक्तीचा भाऊ हा माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी असल्याने या हत्येमागे सूडाची भावना असण्याची शक्यता तपासली जात आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसरात कडक बंदोबस्त तैनात केला. जखमी व्यक्तीवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.




अ.भा.औषधी विक्रेता संघटनेने आज आपल्या विविध मागण्यांसाठी देशव्यापी बंद पुकारला होता. नांदेड जिल्हा केमिस्ट अॅण्ड ड्रगीस्ट असोसिएशनच्यावतीनेही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## पुन्हा सांगतो;राहुल गांधी रिजेक्टेड माल-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई/प्रतिनिधी- शरद पवारांना राग आला तरी मी पुन्हा तेच सांगतो, काँग्रेस नेते राहुल गांधी हे 'रिजेक्टेड माल' अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांनी मोदी-शहांवर केलेल्या टिकेला प्रत्युत्तर दिले.



राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करत भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर गंभीर आरोप केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला.मुख्यमंत्री म्हणाले की, देशाच्या बाहेर भारताची प्रतिष्ठा वाढवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. देशाच्या हिताचा विषय असेल, तर राजकीय मतभेद पान ४ वर

## अशोक खरातला आता २६ मे पर्यंत ईडी कोठडी

### कोठडीत भोंदूबाबाचे धक्कादायक खुलासे

मुंबई/प्रतिनिधी- महिलांच्या लैंगीक शोषण प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरातला ईडी अर्थात अंमलबजावणी संचालनालयाने तब्बल ५ कोटी ६२ लाख रुपयांच्या आर्थिक फसवणुक प्रकरणात ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयात सादर केले असता, न्यायालयाने खरातला २६ मेपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे.

स्वतःला देवाचा अवतार सांगत पूजा-अर्चा आणि धार्मिक विधींच्या नावाखाली कोट्यवधी रुपये उकळल्याचा आरोप असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणात रोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. ईडीच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, अशोक खरातने स्वतःला दैवी शक्ती असलेली व्यक्ती असल्याचे भासवून अनेकांच्या मनात भीती आणि अंधश्रद्धा निर्माण केली. पूजा, धार्मिक विधी आणि संकट दूर करण्याच्या नावाखाली लोकांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळण्यात आले. तपासादरम्यान विविध बँक खात्यांतून मोठ्या रकमा खरातच्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आल्याचे उघड झाले आहे.ईडीच्या माहितीनुसार, काही व्यक्तींना ५० लाख, ८० लाख तर एका व्यक्तीकडून तब्बल ३ कोटी ८० लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. या व्यवहारांतील काही रक्कम अमेरिकेत उपचारासाठी वापरण्यात आल्याचाही दावा तपास यंत्रणेने केला.समता पतसंस्थेत तब्बल ६० वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने खाती उघडण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सर्व खात्यांना लिंक असलेला मोबाईल क्रमांक अशोक खरातचाच असल्याचा दावा ईडीने केला. तसेच अनेक खात्यांमध्ये नॉमिनी म्हणूनही खरातचे नाव असल्याचे सांगण्यात आले.या खात्यांमधून तब्बल २३ कोटी ८० लाख रुपये रोख स्वरूपात काढण्यात आल्याचा आरोप आहे. ही रक्कम नेमकी कुठे आणि कशासाठी पान ४ वर


## 'एआय'च्या युगात मेटातून ८ हजार कर्मचाऱ्यांची कपात

### रात्री दीड वाजता कर्मचाऱ्यांना मेल द्वारे सुचना

मुंबई/प्रतिनिधी-सोशल मीडिया क्षेत्रातील आघाडीची कँपनी मेटा प्लॅटफॉर्म्सने मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपातीची प्रक्रिया सुरू केली असून, या निर्णयाचा फटका तब्बल ८ हजार कर्मचाऱ्यांना बसणार आहे. कँपनीच्या सिंगापूर केंद्रातून या कपातीबाबतचा पहिला संदेश देण्यात आला. अचानक आलेल्या ई-मेलमुळे अनेक कर्मचाऱ्यांना सकाळी डोळे उघडताच नोकरी गेल्याचे समजले.

अमेरिका, युनायटेड किंगडमसह विविध देशांतील कर्मचाऱ्यांना कार्यालयात न येण्याचे आणि घरून काम करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर पहाटेच्या सुमारास कर्मचाऱ्यांच्या मेलबॉक्समध्ये नोकरी कपातीचे ई-मेल येऊ लागले. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, सिंगापूरमधील कर्मचाऱ्यांना स्थानिक वेळेनुसार पहाटे ४ वाजता, तर भारतीय वेळेनुसार पहाटे १.३० वाजता हे ई-मेल प्राप्त झाले.या प्रक्रियेपूर्वी मेटामध्ये सुमारे ७८ हजार कर्मचारी कार्यरत होते. आता हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले असून, आणखी काही कर्मचाऱ्यांची अंतर्गत बदली करण्यात येत आहे. कँपनीच्या अंतर्गत मेमोमध्ये चीफ पीपल ऑफिसर जेनेल गेल यांनी माहिती दिली की, सुमारे ७ हजार कर्मचाऱ्यांची नव्या एआय-आधारित टीममध्ये पुनर्नियुक्ती केली जाणार आहे. तसेच जवळपास ६ हजार रिक्त पदे रद्द करण्यात आली आहेत.कँपनीने व्यवस्थापक स्तरावरील पदांची संख्या कमी करण्याचाही निर्णय घेतला आहे. लहान आणि अधिक वेगाने काम करणाऱ्या टीम्समुळे कार्यक्षमता वाढते, असे जेनेल गेल यांनी मेमोमध्ये नमूद केले आहे.या कर्मचारी कपातीचा सर्वाधिक परिणाम इंजिनिअरिंग आणि प्रॉडक्ट विभागांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वर्षाच्या उत्तरार्धात आणखी कर्मचारी कपात होण्याचीही चर्चा सुरू आहे.दरम्यान, मार्क झुकेरबर्ग यांनी एआय तंत्रज्ञानाला कँपनीचे प्रमुख प्राधान्य दिले आहे.

## मतदारांची 'बुलेट' सुसाट धावणार की, निवडणूक न्यायालयाच्या कचाट्यात अडकणार ?



सरफराज दोसानी

माहूर:सहकार क्षेत्रातील निवडणुका म्हटलं की विचारधारा, विकास आणि सभासदांचे प्रश्न यापेक्षा 'व्यवस्थापन कौशल्य' जास्त महत्त्वाचे मानले जाते, अशी जनमानसात चर्चा असते. त्यात नांदेड जिल्हा बँकेच्या निवडणुकीने तर यंदा वेगळाच रंग घेतला असून, प्रारूप मतदार यादीपेक्षा 'बुलेट यादी'ची चर्चा गावोगावी रंगू लागल्याने राजकीय वातावरणात हास्याची लाट पसरली आहे.

४ मे रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर जिल्हाभरातून तब्बल १२९ हरकती दाखल झाल्या असून, त्यात माहूर तालुक्यातील १४ हरकतींचाही समावेश आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल झाल्याने प्रशासनाने मतदार यादी तयार केली होती की 'प्रायोगिक मसुदा', असा सवाल आता चहाटळ चौकात विचारला जात आहे. विभागीय सह निबंधक हे २५ मेपर्यंत सर्व हरकतींवर निर्णय देणार असून, २९ मे रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. मात्र अंतिम यादीपेक्षा 'अंतिम डिलिव्हरी' कधी होणार याकडेच काहींचे लक्ष लागल्याची कुजबुज आहे. माहूर-किनवट तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून बुलेटची जोरदार चर्चा सुरू आहे. निवडणुकीत मतदारांना विचारांची गती मिळावी म्हणून काही जण रॉयल पातळीवर तयारी करत असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. पण आता हरकती, चौकशा आणि माध्यमांमधील बातम्यांमुळे ही बुलेट सुसाट धावणार की थेट न्यायालयाच्या पार्किंगमध्ये उभी राहणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, एका तालुक्यात एकाचवेळी तब्बल २५ बुलेट दाखल झाल्यास गावोगावी 'धुरळा' उडेल आणि निवडणूक आयोगापेक्षा सोशल मीडियावरच चौकशी सुरू होईल, अशी भीती काही रणनीतीकारांना वाटू लागली आहे. त्यामुळे आता 'दोन चाकी' ऐवजी दोन हजारांच्या चाकांवर भर दिला जाऊ शकतो, अशी मिश्कील चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे काही संभाव्य मतदारांनीही सावध भूमिका घेत, 'आधी अंतिम मतदार यादी येऊ द्या मगच गाडीची टेस्ट ड्राईव्ह घेऊ,' अशी भूमिका घेतल्याचे समजते. तर काहींनी हेल्मेट मिळणार का? अशी विचारणा केल्याने वातावरण आणखी रंगतदार झाले आहे.

एकूणच, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदारांचे प्रश्न बाजूला पडले असून 'मतदारांची गाडी कोणत्या गिअरमध्ये जाणार?' हा खरा चर्चेचा विषय ठरू लागला आहे. आता २९ मेनंतर मतदारांची बुलेट रस्त्यावर धावते की संपूर्ण प्रकरण न्यायालयाच्या स्पीडब्रेकरवर अडकते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# एकीकडे दरवाढ, दुसरीकडे तुटवडा

**जागतिक स्तरावर उद्भवणाऱ्या राजकीय संघर्षांचा आणि युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगावर उमटत असतात. तेल उत्पादक राष्ट्रांमध्ये निर्माण होणारी अस्थिरता विशेषतः जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करते. अमेरिका-इराण-इराक संघर्ष सुरू झाल्यानंतर जगभर पेट्रोलियम पदार्थांच्या उपलब्धतेवर ताण निर्माण झाला. युद्धाच्या सुरुवातीच्या काही दिवसांतच अनेक देशांमध्ये इंधनपुरवठ्यावर परिणाम दिसून आला. भारतही या संकटापासून अलिप्त राहू शकला नाही. देशात पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या उपलब्धतेबाबत चिंता निर्माण झाली आणि सामान्य नागरिकांना त्याची झळ बसू लागली. सत्ताधाऱ्यांकडून सुरुवातीला इंधनाची कोणतीही टंचाई नसल्याचा दावा करण्यात आला. प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले. मात्र दुसरीकडे प्रत्यक्ष वास्तव वेगळे चित्र दाखवत होते. पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा, गॅस सिलेंडरसाठी नागरिकांची होणारी धावपळ आणि वाढती अस्वस्थता हे दृश्य सर्वसामान्य नागरिकांनी अनुभवले. सरकारी दावे आणि वास्तव परिस्थिती यामधील तफावत लोकांच्या चिंतेत अधिक भर घालणारी ठरली.या काळात देशात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुरू होत्या. साहजिकच संपूर्ण राजकीय व्यवस्थेचे आणि माध्यमांचे लक्ष निवडणुकांकडे केंद्रित झाले होते. नागरिकांचेही प्रमुख लक्ष निवडणुकीतील घडामोडींवर होते. या काळात सत्ताधाऱ्यांनी इंधनाच्या किमती वाढू दिल्या नाहीत किंवा तुटवडा तीव्र होऊ दिला नाही. त्यामुळे सर्व काही सुरळीत असल्याचा आभास निर्माण झाला. परंतु निवडणुकांची प्रक्रिया संपल्यानंतर परिस्थितीचे गंभीर स्वरूप समोर येऊ लागले. या पार्श्वभूमीवर इंधन दरवाढीने सर्वसामान्यांच्या चिंतेत आणखी भर घातली आहे. यापूर्वीच केंद्र सरकारने पेट्रोलच्या दरात साडेतीन रुपये वाढ केली होती, तर डिझेल आणि गॅसच्या दरातही वाढ करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा अलीकडेच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अनुक्रमे ८५ पैसे आणि ९० पैशांची वाढ करण्यात आली. ही वाढ पाहता येणाऱ्या काळात इंधनाच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाढत्या इंधन दरांचा परिणाम केवळ वाहनचालकांपुरता मर्यादित राहत नाही; तर वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तू, शेती, उद्योग आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चावर त्याचा थेट परिणाम होतो. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना काटकसरीचे धडे देत संभाव्य संकटांची जाणीव करून दिली. यामागे केवळ आर्थिक विचार नसून भविष्यातील जागतिक परिस्थितीची जाणीव होती. कारण पेट्रोलियम पदार्थांचा निर्माण झालेला तुटवडा हा केवळ एखाद्या सरकारच्या चुकीच्या धोरणाचा परिणाम नाही, तर तो मोठ्या प्रमाणावर जागतिक अस्थिरतेचा परिणाम आहे. युद्धामुळे तेल उत्पादन, पुरवठा आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत होतात. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढतात आणि त्याचा थेट परिणाम भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर होतो. जगातील अमेरिका आणि इतर अनेक राष्ट्रांनी परिस्थितीची गंभीरता ओळखून तत्काळ उपाययोजना करण्यास सुरुवात केली. पर्यायी ऊर्जा स्रोत, धोरणात्मक तेलसाठे आणि पुरवठा व्यवस्थेतील सुधारणा यावर भर देण्यात आला. भारतात मात्र निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष देण्यात काहीसा विलंब झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्याचे परिणाम आता सामान्य नागरिकांना भोगावे लागत आहेत. केवळ संकट आहे असे सांगून सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. संकटाची जाणीव करून देण्याबरोबरच त्यावर ठोस उपाययोजना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पेट्रोलियम पदार्थांवरील अवाढव्य कर कमी करणे, पुरवठा सुरळीत ठेवणे, पर्यायी ऊर्जा स्रोतांवर भर देणे आणि नागरिकांना विश्वासात घेणे याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. कारण देशाचा कणा असलेल्या सामान्य नागरिकांवर संकटाचा सर्वाधिक परिणाम होत असतो. त्यामुळे अशा वेळी शासनाने संवेदनशीलतेने वागून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे हेच खरे कर्तव्य ठरते.**

# नीट पेपर लिक म्हणजे शिक्षण प्रणालीची खुली हत्याच!




देशात शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार म्हणजे युवा पिढीच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होय.देशात अनपेक्षित देशद्रोहाचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.काही देशद्रोही लोकांनी नीट पेपर लिक करून २५ लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळुन खुली हत्या केली आहे व शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराला कँटाळून ४ विद्यार्थांनी आत्महत्या सुध्दा केल्याचे सांगितले जाते.परंतु अजुनपर्यंत शिक्षण क्षेत्रातील कायदे कठोर करण्यात आलेले नाही ही आपली शोकांतिका म्हणावी लागेल. नीट पेपर ज्यामधुन डॉक्टर्स निर्माण होतात म्हणजे एक दैवी शक्तीचा उगम होतो अशा गंभीर परीक्षेचे पेपर लिक होणे म्हणजे शैक्षणिक क्षेत्राची खुली हत्याच म्हणावी लागेल.कारण नीट पेपरच्या संबंधित विभागाने पेपर लिक करून विद्यार्थ्यांच्या आयुष्या सोबत घाणेरडा खेळ खेळला आहे. त्याचप्रमाणे पेपर लिक प्रकरणातील दोषींनी विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खुला खिलवाळ केला त्यामुळे या प्रकरणातील संपूर्ण दोषींना सजा-ए-मौत व्हायला पाहिजे तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव आहे.

शिक्षण क्षेत्रातील किंवा पेपर लिक प्रकरणातील संपूर्ण कारणामे राजकीय आश्रयाशिवाय होऊच शकत नाही.त्यामुळे या प्रकरणातील मुख्य मासे अजुनपर्यंत समोर आलेलेच नाही.कारण पेपर लिक करणारा आणि घेणारा हा गडगंज संपत्तीवाला व्यक्ती असतो आणि पेपर लिक करणाऱ्यांचे जाळे सुद्धा अफाट असते ही बाब आता उघडकीस येत असलेल्या प्रकरणावरून लक्षात येते.कारण हा पेपर जेथुन तयार झाला तेथुनच फुटला आहे म्हणजे खरा देशद्रोही आपल्याच घरात आहे (घर का भेदी लंका ढाए) त्यामुळे २५ लाख मुलांच्या भविष्याशी खेळणाऱ्यां संपूर्ण आरोपींना फाशीची शिक्षा अत्यंत आवश्यक आहे.कारण पेपर लिक प्रकरणातील आरोपींनी विद्यार्थ्यांचे उभे आयुष्य बर्बाद करून शिक्षण प्रणालीची खुली हत्या करून कलंकित केले आहे.त्यामुळे या प्रकरणातील दोषींना फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून फासावर लटकविले पाहिजे. बलात्कारी हा देशाच्या सभ्यतेचा हत्यारा आहे व भ्रष्टाचारी हा १४० कोटी जनतेचे रक्त पिऊन जनतेला मृत्यूच्या खाईत लोटत आहे.त्याचप्रमाणे नीट प्रकरणातील दोषी देशाचे भविष्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांचा हत्यारा आहे त्यामुळे या तिन्ही प्रकरणातील दोषींवर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून निकाल लावून ताबडतोब फाशीची शिक्षा सुनावली तरच यात सुधारणा होऊ शकते.अन्यथा तुका म्हणे उगे रहा जे जे होईल ते ते पहा ही म्हण सरकारला लागू होऊ शकते.पुणे क्षेत्राचे नाव शिक्षण क्षेत्रात भारतभर प्रसिद्ध आहे.परंतु येथुन संपूर्ण देशात जहर घोळण्याचे काम पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून महाराष्ट्राला देशात बदनाम केले आहे आणि आता पुन्हा सीबीआय ने लातूर मधील बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचाअर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकरला अटक करण्यात आली आहे.यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ- मोठे मासे आपल्या महाराष्ट्रात घर करून आहे व शिक्षण प्रणालीला पोखरत आहे.नीट पेपर लिक प्रकरण हे येणाऱ्या भविष्यावर काळा धब्बा आहे.त्यामुळे देशभरात नीट पेपर लिक प्रकरणामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. सरकारला शिक्षण प्रणाली मजबूत करायची असेल आणि शिक्षण क्षेत्रातील माफियाराजचा सफाया करायचा असेल तर या प्रकरणातील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हायलाच पाहिजे अन्यथा शिक्षण क्षेत्रातील हा गोरखधंदा असाच सुरू राहिल यात तिळमात्र शंका नाही.कारण गुन्हेगारांना अनेक पळवाटा आहेत त्यातुन ते मार्ग काढून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू ठेवून पळवाट काढतील.परंतू पेपर लिक प्रकरण हा देशाच्या १४० कोटी जनतेवर व शिक्षणाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर घणाघाती प्रहार आहे.यांना सरकारने वेळीच रोखले नाही तर अनर्थ होऊ शकतो. सरकार विद्यार्थांना खरोखरच न्याय देण्यास सक्षम असेल तर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून पेपर लिक प्रकरणातील निकाल लावून फासावर लटकविले पाहिजे.कारण पेपर लिक प्रकरणातील गुन्हेगारांनी आरोग्य व डॉक्टर या शब्दाला कलंकीत केले आहेत.त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची दयामाया नकोच.देशात जेव्हापासून खाजगी कोचिंग क्लासेस व खासगी शाळा-महाविद्यालये अस्तित्वात आली तेव्हा पासून संपूर्ण शिक्षण प्रणाली कलंकित झाल्याचे दिसून येते ही बाब नीट पेपर लिक प्रकरणावरून लक्षात येते.आज खाजगी कोचिंग क्लासेसमुळे व खासगी शाळा-महाविद्यालयामुळे देशातील अनेक पालक वर्ग आपल्या मुलांना सरकारी शाळा- महाविद्यालये पाठविण्यास तयार नाहीत त्यामुळे आज देशातील अनेक सरकारी शाळा-महाविद्यालये बंजार असल्याचे दिसून येते किंवा बंद पडलेल्या अवस्थेत आहेत किंवा धुळ खात आहेत.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सरकारला खरोखरच सुधारणा करायची असेल व पेपर लिक प्रकरण टाळायचे असेल तर सर्वप्रथम सरकारी शाळा-महाविद्यालये सुधारून; खाजगी कोचिंग क्लासेस व खासगी शाळा-महाविद्यालयावर अंकुश लावावा लागेल तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव होवू शकते.कारण खाजगी कोचिंग क्लासेस हे शिक्षणाचे क्षेत्र कमी व व्यवसायाचे क्षेत्र जास्त बनल्याचे दिसून येते.जय हिंद!

**रमेश लांजेवार**
नागपूर.

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्या-जिल्हाधिकारी कर्डिले



नांदेड/प्रतिनिधी-भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदार संघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्व विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आज सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील एकूण ८ मतदान केंद्रांवर १८ जून २०२६ रोजी स.८ ते दु.४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.दुष्काळ, पाणीटंचाई, नैसर्गिक आपत्ती यासारखी परिस्थिती वगळता आचारसंहिता कालावधीत विविध योजनांच्या शासकीय व नवीन जाहिराती देता येणार नाहीत. तसेच नवीन मान्यता, शासकीय कामांचे उद्घाटने करता येणार नाहीत. ग्रामसभेसह कोणत्याही कार्यालयात शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती राजकीय बैठका घेण्यासही मनाई आहे. मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही काम या कालावधीत करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही योजना किंवा राजकीय व्यक्तींची छायाचित्रे ठेवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व संबंधितांना केले. निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी यावेळी दिली. मुक्त व निर्भय वातावरणात निवडणूक पार पडावी, तसेच मतदारांवर कोणताही प्रभाव पडणार नाही यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी प्रास्ताविकात निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्यामुळे त्यांचे सदस्य मतदार राहणार नसल्याची माहितीही त्यांनी दिली. याबैठकीपुर्वी निवडणूकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसोबत बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदान प्रक्रिया, प्रचारासंदर्भातील नियम, परवानग्या तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# वळंकी येथील लाभार्थ्यांना भूखंडांचे वाटप



मुखेड/प्रतिनिधी-लेंडी प्रकल्प अंतर्गत मुखेड तालुक्यातील वळंकी येथील बाधित लाभार्थ्यांसाठी तहसील कार्यालय मुखेड येथील सभागृहात भूखंड वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी देगलूरचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी अनुप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला लाभार्थ्यांची यादी वाचून दाखवण्यात आली. त्यानंतर १५४ पात्र लाभार्थ्यांपैकी १४७ लाभार्थ्यांना लॉटरी पद्धतीने भूखंडांचे वाटप करण्यात आले. सोडतीची चिठ्ठी नेहा गुडमे यांच्या हस्ते काढण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी उपस्थित लाभार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. शासनाच्या नियमानुसार सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. काही काळ लाभार्थ्यांनी भूखंड घेण्यास नकार दिला होता पण उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे मार्गदर्शन घेत परिस्थिती व्यवस्थितरित्या हाताळून लाभार्थ्यांना प्लॉट वाटप करून प्रकल्पग्रस्तांचे समाधान केले. या कार्यक्रमास पोलिस उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी, उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार धनंजय राऊत, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, लेंडी प्रधान प्रकल्पाचे अभियंता श्री भोयर, अभियंता सुळकेकर, मंडळ अधिकारी एम. व्ही. पांचाळ, ग्राम महसूल अधिकारी के. एम. कोंडलवाड, ग्रामपंचायत अधिकारी तुडमे, महसूल सहाय्यक श्रीमती सुभेदार मॅडम, गिरी महसूल सहाय्यक, विजय चव्हाण महसूल सेवक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. भूखंड वाटपाच्या वेळी वळंकी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि मोठ्या संख्येने लाभार्थी नागरिक उपस्थित होते.

# देगलूर तालुक्यातील नाल्यांची सफाई पावसाळ्यापूर्वी होणार का?

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील अनेक गावांमधील नाले गेल्या अनेक वर्षापासून गाळ,रेती व झाडी झुडपांनी भरल्याने पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असून शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेत राज्याचे व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी जिल्ह्यातील जलसंधारणाची रखडलेली कामे कातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिल्यानंतर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये अशीच वातावरण निर्माण झाले आहे.

१२ मे रोजी मंत्री संजय राठोड यांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या उपस्थितीत झालेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीतील निर्देशानंतर आता प्रत्यक्षात जिल्ह्यातील तलावासह देगलूर तालुक्यातील नाल्यांचे सरळीकरण, खोलीकरण व साफसफाईची कामे पावसाळ्यापूर्वी सुरू होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.कारण अनेक नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होत असून पावसाचे पाणी थेट शेत शिवारात घुसून सुपीक जमिनीचे नुकसान करत आहे. खा.डॉ. अजित गोपछडे यांनीही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या शासन दरबारी मांडून जलसंधारणाच्या कामाकडे विशेष लक्ष वेधल्याचे १२ मे रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत दिसून आले. जलसंधारण मंत्री राठोड आणि खा. अजित गोपछडे यांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे ग्रामीण भागातील नागरिकाकडून समाधान व्यक्त केले जात असले तरी प्रशासनाने प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी, अशी अपेक्षा माजी सरपंच सौ. भारतबाई उत्तम मोरेवाड लोणी व देगलूर तालुक्यातील अनेक माजी सरपंच व शेतकरी यांच्यासह अनेकांकडून व्यक्त होत आहे. जलसंधारण विभागाने तातडीने सर्वेक्षण करून नाल्यांची खोलीकरण, रुंदीकरण व सरळीकरणाची कामे युद्धपातळीवर हाती घेतली तर यंदाच्या पावसाळ्यात मोठे नुकसान टाळता येऊ शकते, असे मत देगलूर तालुक्यातील लोणी येथील सौ. भारतबाई उत्तम मोरेवाड यांच्यासह जाणकाराकडून व्यक्त होत आहे. आता मंत्री संजय राठोड यांच्या सूचनांची अंमलबजावणी कितपत वेगाने होते. यावरच तालुक्यातील शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून असल्याची चर्चा ग्रामीण भागात रंगू लागली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पिंपरीचे महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी

पिंपरी चिंचवड:पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगेंना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या समाधान हेल्पलाईन वर कॉल करुन महापौरांना धमकवण्यात आलं आहे. आशिष जमदाडे-पाटील नावाच्या व्यक्तीनं हा फोन केला होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे. ही व्यक्ती महापौरांना काही महिन्यांपूर्वी दोन वेळा भेटली होती. क्रीडा संबंधित काही काम घेऊन त्यांनी महापौरांची भेट घेतली होती. त्यानंतर आत्ता थेट जीवे मारण्याची धमकी दिल्यानं खळबळ उडाली.

भोसरी पोलिसांनी आशिष जमदाडेला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो मानसिक तणावात असल्याचं दिसून आलं. त्यामुळं समज देऊन त्याला सोडण्यात आलं, अशी माहिती महापौरांनी दिली.पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, धमकी देणाऱ्या व्यक्तीने थेट पोलीस आयुक्तालयाच्या (सीपी ऑफिस) 'समाधान हेल्पलाईन'वर कॉल करून ही धमकी दिली मी रवी लांडगे यांना मारून टाकणार आहे, अशी भाषा या व्यक्तीने कॉलवर वापरली होती.

# अनधिकृत जाहिरात होर्डींग प्रकरणी दोन गुन्हे दाखल

नांदेड/प्रतिनिधी-झोपेतून उठलेल्या महापालिका प्रशासनाला अनधिकृत बॅनर व होर्डींगची आठवण झाली आहे. नांदेड शहरातील मध्यवर्ती बाजारपेठ असलेल्या शिवाजी नगर भागात महानगरपालिकेतर्फे अनधिकृत जाहिरात होर्डींग्सवर धडक कार्यवाही करुन बजाजनगर येथे खाजगी बिल्डर धवन रेसीडन्सीचे बॅनर लावणारे अनिल दिलीप यादव, गणेश कटकम कंत्राटदार व विशाल माठी यांच्यासह बॅनर तयार करणारे व लावणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नांदेड शहरातील अनधिकृत बॅनर व होर्डींगवर कारवाई करण्यास महापालिका प्रशासन दिरंगाई करत असत. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृत बॅनर, कटआऊट व होर्डींगचा सुळसुळाट झाल्याने शहराचे विद्रुपीकरण झाले होते. अखेर महापालिका प्रशासनाचे वरिष्ठांनी कान टोचल्यानंतर कारवाईचे सत्र सुरु केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मनपा हद्दीमध्ये जाहिरात फलक लावण्यासाठी एकुण ११८ ठिकाणे निश्चित केले असुन सदरील ठिकाणी जाहीरात फलकांच्या फ्रेम लावण्यात आलेल्या असुन त्या फ्रेमची साईज सुध्दा निश्चित करण्यात आलेली आहे. ज्यामध्ये महानगरपालिकेने निर्धारीत केलेले शुल्क भरुन नागरीकांना व स्वंयसेवी संस्थांना तात्पुरती जाहिरात लावता येते. परंतु शहरातील खाजगी बिल्डर यांच्यासह बॅनर तयार करणारे व लावणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुध्द विनापरवानगी जाहिरात फलक लावण्यात आल्याचे मंगळवार दि.१९ मे रोजी निदर्शनास आल्याने महाराष्ट्र विरुपन प्रतिबंधक कायदा १९९५ चे कलम ३ चे उल्लंघन केल्यामुळे संबंधीत बिल्डर व इतर व्यक्ती विरुध्द भाग्यनगर पोलीस स्टेशन येथे महानगरपालिके तर्फे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच कौठा भागात मुख्य रस्त्यालगत




अनधिकृत बॅनर लावल्या प्रकारणी सिडको ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने अतिरिक्त आयुक्त गिरिश कदम व उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी नगर क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, इमारत निरीक्षक भरत शिवपुरे, अतिक्रमण पथक प्रमुख विशाल सोनकांबळे, दत्ता कल्याणकर व त्यांच्या अतिक्रमण पथकाने पार पाडली आहे.

# हडसनीतील धोकादायक डीपींमुळे नागरिक संतप्त;उपोषणाचा दिला इशारा

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील मौजे हडसनी जुनी व नवी गावातील धोकादायक अवस्थेतील सिंगल फेस डीपींमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, सात दिवसांत डीपी दुरुस्त न केल्यास दि.२८ मे रोजी महावितरण कार्यालय माहूर समोर बेमुदत आमरण उपोषण छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत उपकार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय माहूर यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत हडसनी अंतर्गत जुनी व नवी हडसनी येथे असलेल्या चारही सिंगल फेस डीपी अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, डीपीचे कीटकॅट खुले आहेत. तसेच फ्युज म्हणून उघड्या तारांचा वापर केला जात असल्याने मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, हे डीपी नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या ठिकाणी आहेत. हडसनी जुनी येथील हनुमान मंदिर परिसर व ग्रामपंचायत कार्यालयाजवळील डीपी, तर नवी हडसनी येथील महाकाली मंदिर परिसर व गोकुळ राठोड यांच्या घराजवळील डीपी नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शालेय विद्यार्थी, लहान बालके व पाळीव जनावरे या परिसरातून सतत ये-जा करीत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी यापूर्वी अनेकदा तोंडी व लेखी स्वरूपात महावितरणकडे तक्रारी करूनही अधिकाऱ्यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच महावितरण जागे होणार का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणा, वेळकाढूपणा आणि निष्क्रिय कारभारामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून, भविष्यात कोणतीही जीवितहानी झाल्यास त्यास सर्वस्वी महावितरण कंपनी जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. सात दिवसांच्या आत धोकादायक डीपी सुरक्षित करून न दिल्यास दि.२८ मे रोजी महावितरण कार्यालयासमोर हडसनी गावातील नागरिकांच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनावर विनोद शेंडे, अमोल शेंडे, राजू कदम, आशीर्वाद शिंदे, अरविंद कदम, वसंतराव जाधव, आरिफ खान शरीफ खान, प्रविण शिंदे, जीवन जाधव, युसूफ खान कासम खान, दस्तगीर खान, अर्जुनराव शिंदे, शामराव हुबे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुखेडचे पो.नि.लक्ष्मण केंद्रे यांच्याकडून संशयीतास जबर मारहाण

## हनुमंत मामीलवाड यांची कारवाई करण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-मुखेड पोलीस ठाणे निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी संशयीताला ताब्यात घेऊन जबर मारहाण करीत त्याचे दोन्ही हात निकामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे हनुमंत मामीलवाड व राजमुद्रा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष सचिन पा. इंगोले यांनी केली आहे. अन्यथा या विरोधात विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या कार्यालयासमोर व आझाद मैदान येथे आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

मुखेड पोलीस ठाणे निरीक्षक लक्ष्मण व्यंकटराव केंद्रे हे पॉलिसी अधिकाराचा गैरवापर करून कोणासही संशयावरून ताब्यात घेत जबर मारहाण करून खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन पैसे उकळतात असा आरोप हनुमंत मामीलवाड व सचिन पा. इंगोले यांनी दिलेल्या निवेदनात केला आहे. विशाल राजेंद्र सांगवे रा. मुखेड यांनी याबाबत न्यायाची अपेक्षा करून दिलेल्या निवेदनात नमूद केले की दि.६ मार्च २०२६ रोजी त्यांना लक्ष्मण केंद्रे यांनी विनाकारण ताब्यात घेऊन दोन्ही हात बांधून जबर मारहाण केली होती. या मारहाणीमुळे त्यांचे दोन्ही हात निकामी झाले असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र, साक्षीदार व पुराव्यासह तक्रार केली आहे. पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे अधिकाराचा गैरवापर करून अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांकडून प्रति वाहन रुपये ३० हजार घेत असल्याचे सांगितले आहे. तसेच सर्वसामान्यांना वेठीस धरून मोठी रक्कम उकळण्याचा आरोप केला आहे. या बाबीची गांभीर्याने चौकशी कारवाई करण्याची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे हनुमंत मामीलवाड व सचिन पा. इंगोले यांनी केली आहे अन्यथा या विरोधामध्ये पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे कार्यालयसमोर दि. २८ मे २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला याउपर कारवाई न झाल्यास दि.३ जून पासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन करणार आहेत.

# खा.अशोकराव चव्हाण यांच्या विश्वासास पात्र ठरले विनोद पा.चिंचाळकर

## भोकर न.प.स्वीकृत सदस्यपदी झाली निवड



भोकर/प्रतिनिधी-राजकीय क्षेत्रामध्ये नेत्यांचा कार्यकर्त्यावर मोठा विश्वास असावा लागतो, कार्यकर्त्याच्या कुशल नेतृत्वाने सत्ता जिंकता येते, भोकर मध्ये नेत्यांनी कार्यकर्त्यावर दाखविलेल्या विश्वासाचा प्रत्यय आला. भोकर नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर यांची झालेली निवड महत्त्वाची मानली जात आहे, नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत चिंचाळकर यांचा पराभव झाल्यानंतरही त्यांची खा. अशोकराव चव्हाण यांनी स्वीकृत सदस्य पदी निवड करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

भोकर नगर परिषदेची प्रथम निवडणूक २०१० साली झाली त्यावेळी विनोद पा. चिंचाळकर यांना उच्चशिक्षित नवतरुण म्हणून संधी देण्यात आली ते नगरसेवक म्हणून निवडूनआले अडीच वर्षाच्या कालखंडानंतर त्यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली त्या काळात मोठ्या प्रमाणावर भोकर शहराच्या विकासाची कामे मार्गी लागली अशोकराव चव्हाण हे त्यावेळी मुख्यमंत्री होते निधीला कुठलीच कमतरता भासू दिली नाही अनेक विकास कामांना प्राधान्य देण्यात आले अनेक वर्षापासूनची रखडलेली पाणीपुरवठा योजना त्याच काळात सुरू झाली, रस्ते, शहरातील शासकीय कार्यालय, रेल्वे उड्डाणपूल शहरातील रस्ते दुभाजक नाल्या विद्युत व्यवस्था अशी सर्वच कामे मोठ्या प्रमाणावर झाली. झालेल्या आरोपाची चिंता न करता चिंचाळकर यांनी आपली विकासाची ध्येय दृष्टी चालूच ठेवली. २०१५ च्या निवडणुकीत सौ. संगीता विनोद चिंचाळकर ह्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या अडीच वर्षाच्या कालखंडानंतर त्यांनाही नगराध्यक्षपदाची संधी मिळाली त्या काळामध्ये ही मोठ्या प्रमाणावर विकास कामांना गतिमानता आली शहराच्या वैभवात भर पडली. प्रशासकाचा पाच वर्षाचा काळ गेल्यानंतर डिसेंबर २०२५ मध्ये पुन्हा निवडणूक झाली भाजपाची बहुमताने सत्ता आली मात्र विनोद पाटील चिंचाळकर यांचा पराभव झाला. पराभवाला जबाबदार कोण? कोण राजकीय व्युहरचना रचली? कसे राजकारण झाले या सर्व बाबी लक्षात घेता विनोद पा. चिंचाळकर यांचा १० वर्षाचा नगर परिषदेतील अनुभव पाहता त्यांना नगर परिषदेत येणारा निधी कसा कुठून आणावा लागतो कामे कशा प्रकारची कुठे करावी लागतात हा मोठा अनुभव असल्याने खा.अशोकराव चव्हाण यांनी कार्यकर्त्यावर मोठा विश्वास दाखवत चिंचाळकर यांना स्वीकृत सदस्य पदाची संधी दिली यामुळे नगर परिषद कारभाराला चालना मिळणार असून नवीन विकास कामाला पुन्हा जोमाने सुरुवात होणार आहे.

# कुंटूर पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट

नायगाव/प्रतिनिधी-कुंटूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र समोर येत असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अवैध गुटखा विक्री, गोदावरी नदीपात्रातून काळी माती व वाळूचे मोठ्या प्रमाणात उत्खनन, तसेच अवैध वाहतूक खुलेआम सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने विविध ठिकाणी धाडी टाकत मोठ्या प्रमाणात कारवाया सुरू केल्याने अवैध व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. सांगवी परिसरात गोदावरी नदीतील माती उत्खनन आणि मोठ्या प्रमाणात मुरम उपसा होत असल्याची चर्चा असून, अंतरगाव परिसरातही नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असल्याचे नागरिक सांगत आहेत. मात्र संबंधितांवर प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, इजतगाव येथे मागील महिन्यात बिलोली उपविभागाचे डीवायएसपी पानेगावकर यांच्या पथकाने धाड टाकून मोठी कारवाई केली होती. त्या वेळी अवैध वाळू उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या बोटी जाळण्यात आल्याची माहिती समोर आली होती. तसेच राहेर परिसरातही वाळू उत्खनन करणारे रॅकेट सक्रिय असल्याचे बोलले जात असून, हूसा येथे काल रात्री उशिरा पोलीस महानिरीक्षकांच्या पथकाने धाड टाकून कारवाई केल्याची माहिती मिळत आहे.अशा प्रकारच्या सातत्यपूर्ण धाडी व कठोर कारवाया झाल्यास अवैध धंद्यांना कायमस्वरूपी आळा बसू शकतो, असे मत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले आहे. महसूल विभाग, स्थानिक पोलीस प्रशासन तसेच एलसीबी पथकाकडून अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत.


## प्रवेश देणे चालू आहे

**कै.गणपत भारती वैद्यकीय व शिक्षण प्रसारक**

**मंडळाद्वारा संचलित**

**श्री समर्थ विद्यार्थी वस्तीगृह ता.हदगाव जि.नांदेड**

**मान्य संख्या = ३० + ४ = ३४**

सन २०२६ - २०२७ या वर्षाकरिता इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अनुदानीत वस्तीगृहात खालील जाती निहाय टक्केवारी प्रमाणे प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जाती निहाय | टक्केवारी | प्रवेश संख्या |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (एस.सी.) | ६७ % | १५ |
| २) | अनुसुचित जमाती (एस.टी.) | १४ % | ०४ |
| ३) | वि.जा.भ.जमाती (एन.टी.) | १७ % | ०५ |
| ४) | विशेष मा.प्रवर्ग (एस.बी.सी.) | ०२ % | ०१ |
| ५) | इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) | १५ % | ०४ |
| ६) | खुला प्रवर्ग (ओपन) | ०५ % | ०१ |
| | एकूण | १२० टक्के | ३४ |

**वैशिष्ट्य :-** सुसज्ज इमारत, जेवणाची उत्तम सोय, पुरेशी विद्युत व्यवस्था, विनामुल्य प्रवेश, विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष.

**टिप :-** सर्व विद्यार्थ्यांना मोफत पत्राची पेटी, ताट, तांब्या, गादी, सतरंजी ब्लँकेट देण्यात येईल.

-: संपर्क :-

**अध्यक्ष** **अधिक्षक**

**श्री समर्थ विद्यार्थी वस्तीगृह**

**ता.हदगाव जि.नांदेड मो.९९२२६५२५९८/७३७८३४५२४५**



## प्रवेश देणे चालू आहे

**कै.गणपत भारती वैद्यकीय व शिक्षण प्रसारक**

**मंडळाद्वारा संचलित**

**श्री समर्थ वस्तीगृह हदगाव ता.हदगाव जि.नांदेड**

**मान्य संख्या = २० + ४ = २४**

सन २०२६ - २०२७ या वर्षाकरिता इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अनुदानीत वस्तीगृहात खालील जाती निहाय टक्केवारी प्रमाणे प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जाती निहाय | टक्केवारी | प्रवेश संख्या |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (एस.सी.) | ६७ % | १५ |
| २) | अनुसुचित जमाती (एस.टी.) | १४ % | ०२ |
| ३) | वि.जा.भ.जमाती (एन.टी.) | १७ % | ०२ |
| ४) | विशेष मा.प्रवर्ग (एस.बी.सी.) | ०२ % | ०१ |
| ५) | इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) | १५ % | ०३ |
| ६) | खुला प्रवर्ग (ओपन) | ०५ % | ०१ |
| | एकूण | १२० टक्के | २४ |

**वैशिष्ट्य :-** सुसज्ज इमारत, जेवणाची उत्तम सोय, पुरेशी विद्युत व्यवस्था, विनामुल्य प्रवेश, विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष.

**टिप :-** सर्व विद्यार्थ्यांना मोफत पत्राची पेटी, ताट, तांब्या,गादी, सतरंजी ब्लँकेट देण्यात येईल.

-: संपर्क :-

**अध्यक्ष** **अधिक्षक**

**श्री समर्थ वस्तीगृह हदगाव**

**ता.हदगाव जि.नांदेड मो.९१५८३३०९८४**


## जाहीर प्रगटन

ग्रामपंचायत कार्यालय इज्जतगाव तालुका उमरी जिल्हा नांदेड यांच्यामार्फत देण्यात आलेले सदरील जाहीर प्रगटनाद्वारे इ.स.१९८४-१९८५ मध्ये पुनर्वशीत नई आबादी इज्जतगाव येथे आम्हा मिळालेले खालील फ्लॅट धारकांचे नाव (१) प्रल्हाद बाबाराव ढगे वय ६८ वर्ष रा.इज्जतगाव फ्लॅट क्रमांक २३ (२) अनिरुद्ध बाबाराव ढगे वय ६० रा. इज्जतगाव फ्लॅट क्रमांक २४ (३) कै. अशोकराव बाबाराव ढगे मयताची वारस पत्नी श्रीमती मंगलबाई अशोकराव ढगे वय ५० वर्ष राहणार इज्जतगाव फ्लॅट क्रमांक २५ (४) रावसाहेब गणपती ढगे वय ७० वर्ष रा. इज्जतगाव फ्लॅट क्रमांक २६ (५) गोपीनाथ ग्यानोबा ढगे वय वय ६२ वर्ष रा इज्जतगाव फ्लॅट क्रमांक २७ आम्हा सर्वांना शासनाने दिलेले ४०x५० साईजचे फ्लॅट ग्रामपंचायत कार्यालय मधील मालमत्ता रजिस्टर मध्ये ८ अ च्या उतारा घेण्यासाठी जाहीर प्रगटन देण्यात येत आहे सदरील जाहीर प्रगटनावर गावातील नागरिक व इतर नातेवाईकांचा काही आक्षेप किंवा तक्रार असल्यास जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या पंधरा दिवसाच्या आत ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत कार्यालय मध्ये कार्यालयीन वेळेत कागदी पुरावे घेऊन अक्षेप किंवा तक्रार असल्यास स्वीकारले जाईल मुदत संपल्यानंतर कोणाचे आक्षेप किंवा तक्रार असल्यास विचारात घेण्यात येणार नाही सदरील जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते

| स्वाक्षरी/- | स्वाक्षरी/- |
|---|---|
| सरपंच | ग्रामविकास अधिकारी |
| ग्रामपंचायत कार्यालय | कार्यालय इज्जतगाव नवी आबादी |
| इज्जतगाव | ता.उमरी जिल्हा नांदेड |

# कोठारी-इस्लापूर महामार्गाचे काम तात्काळ थांबवण्याचे ना.गडकरींचे निर्देश

## कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची तयारी;आ.केरामांच्या पाठपुराव्याला यश

किनवट/प्रतिनिधी- कोठारी (चि) ते इस्लापूर या राष्ट्रीय महामार्गा (१६१-ए) च्या कामातील अनियमितता आणि लोकांच्या तक्रारींची आ.भीमराव केरामांनी दखल घेत आज (२० मे) दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची भेट घेऊन पत्र सोपवले. पत्राची दखल घेत संबंधित कंत्राटदार राठी यांच्या कासवगतीने चालू असलेली तात्काळ कामे थांबवून एजन्सी काळ्या यादीत टाकून उर्वरित कामांच्या फेर निविदा काढण्याचे निर्देश मंत्री गडकरीनी राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य अभियंता शेलार यांना दिल्याचे सुत्रांनी सांगितले.

राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१-ए या महामार्गावरील कोठारी ते सरसम मार्गावर निर्माणाधीन असलेल्या विकास कामांतील अनियमिततेने रस्ते विकासाची वाट लावली. प्रधानसांगवी जवळील टोलनाक्याच्या उभारणीचे काम चालू आहे ते तात्काळ थांबविण्यात यावे. रस्त्याच्या कामावरच आक्षेप आहे. साईड भरम केलेला नाही. चिखली-गोकुळनगर दरम्यान तर सीसीकरण केलेला रस्ता फुटून भेगा पडल्या आहेत. कित्येक अपघात होऊन लोकांना दुखापती सोसाव्या लागल्या. रस्त्यात खड्डेचखड्डे पडल्याने प्रवासी त्रस्त झाले आहेत. तात्पर्य असे की, समाधानकारक आणि कालमर्यादेच्या अनुषंगाने या कंत्राटदाराने सर्व अटी-शर्थीचा भंग केलाय. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह विभाग या कंत्राटदाराने बदनाम केल्याचा ठपका ठेवण्यात आलाय. अशा विविध आरोपांचे पत्र आमदार केरामांनी केंद्रीय मंत्री गडकरींकडे सोपवल्यामुळे मंत्री गडकरींनी देखील तेवढ्याच तत्परतेने कामे थांबवून एजन्सी काळ्या यादीत टाकण्यासाठी मुख्य अभियंत्यांना कळविले आहे. शक्य तेवढ्या लवकर फेर निविदा काढून जलदगतीने कामे पूर्ण करुन घेण्याचे निर्देश दिल्याचे सुत्रांनी सांगितले. या महामार्गाला लागलेले शुक्लकाष्ठ आता संपुष्टात आले असून नव्या उमेदीने झपाट्याने कामे पूर्ण होतील असे सांगण्यात आले.



## माहूरमध्ये इंधन टंचाईमुळे वाहनचालक हैराण

माहूर/प्रतिनिधी-येथील पेट्रोल पंपांवर वारंवार निर्माण होणाऱ्या इंधन टंचाईमुळे वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. कधी पेट्रोल उपलब्ध असते तर डिझेल संपलेले असते, तर कधी डिझेल मिळत असून पेट्रोल नसल्याची परिस्थिती निर्माण होत आहे. वाहनधारकांना विदर्भातील धनोडा तसेच महामार्गावरील इतर पेट्रोल पंपांवर संपर्क साधून इंधन उपलब्धतेची माहिती घ्यावी लागते. त्यानंतरच त्या ठिकाणी पेट्रोलसाठी धाव घ्यावी लागत आहे. विशेष म्हणजे माहूर खालच्या लखमापूर व वाई बाजार परिसरातील पेट्रोल पंपांवरही अशीच अवस्था असल्याने नागरिकांची अडचण अधिक वाढली आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून माहूर येथील पेट्रोल पंपांवर इंधनाचा सतत तुटवडा जाणवत आहे. माहूर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक चारचाकी वाहनांनी दर्शनासाठी येत असतात. मात्र इंधन उपलब्ध नसल्यामुळे भाविकांनाही मोठा फटका बसत असून, एकमेकांकडून चौकशी करून ज्या ठिकाणी इंधन उपलब्ध आहे त्या ठिकाणी जावे लागत आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे. दरम्यान, शेती हंगाम तोंडावर आल्याने ट्रॅक्टरसाठी डिझेलची गरज वाढली आहे. मात्र वेळेवर डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची शेतीची कामेही खोळंबत असल्याचे चित्र आहे. पेट्रोल पंप असूनही वारंवार निर्माण होणाऱ्या या समस्येमुळे वाहनचालक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# मांडवीत कृषी सेवा केंद्राची कृषी विभागाकडून तपासणी


मांडवी/प्रतिनिधी-युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना चढ्या दराने खत विक्री होत असल्याच्या तक्रारी आणि प्रसार माध्यमातील वृत्तांची दखल घेत कृषी विभागाने मोठी कारवाई केली आहे. दि.२० (बुधवार) रोजी सकाळी ११ वाजता तालुका कृषी अधिकारी व गुण नियंत्रक यांच्या पथकाने मांडवी येथील कृषी केंद्रांची अचानक झाडाझडती घेतली. या धडक मोहिमेमुळे मांडवीतील खत विक्रेत्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, कारवाईच्या भीतीने एका दुकानदाराने चक्क शटर पाडून पळ काढला.

किनवट पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी शिवराम मुंडे आणि गुण नियंत्रक गजानन भालेवाड यांच्या पथकाने मांडवी येथील दुकानांची तपासणी केली असता गंभीर बाबी समोर आल्या. जगदंबा कृषी सेवा केंद्र व श्री कृपा कृषी सेवा केंद्र या दोन्ही दुकानांमधील युरिया खताच्या प्रत्यक्ष साठ्यात आणि कागदोपत्री नोंदीत मोठी तफावत आढळून आली. शेंडे कृषी केंद्र या दुकानात चौकशी केली असता, ज्या व्यक्तीच्या नावावर शेतीच नाही, अशा बोगस व्यक्तीच्या नावाने पावती फाडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. रामचंद्र सात कृषी सेवा केंद्र अधिकाऱ्यांचे पथक येताच कारवाईच्या धास्तीने दुकान मालक दुकान बंद करून पसार झाला. कडक कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे धाडणार त्याच बरोबर ज्या कृषी केंद्रांच्या साठ्यात तफावत आढळली आहे आणि ज्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठीचा विस्तृत प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवला जाणार आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी शिवराम मुंडे व गजानन भालेवाड यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. कृषी विभागाच्या या धडक कारवाईमुळे साठेबाजांचे धाबे दणाणले असून, आता या दोषी कृषी केंद्र चालकांचे परवाने रद्द होणार की त्यांच्यावर गुन्हे दाखल होणार? याकडे परिसरातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### अधिकाऱ्यांसमोरच दुकानदाराचा उद्धटपणा ;अधिकारी संतापले

तपासणी सुरू असतानाच श्री कृपा कृषी सेवा केंद्रात एक शेतकरी युरिया खत मागण्यासाठी आला.गोदामात व स्टॉक रजिस्टरवर ७० पोते साठा उपलब्ध असूनही दुकानदाराने अधिकाऱ्यांसमोरच,माझ्याकडे युरियाचे एकही पोते नाही असे उद्धट उत्तर शेतकऱ्याला दिले. दुकानदाराचा हा बेजबाबदारपणा पाहून तपासणी अधिकाऱ्यांचा संताप अनावर झाला.साठा असतानाही शेतकऱ्यांना खत नाकारणे आणि त्यांची लूट करणे खपवून घेतले जाणार नाही. अशा दुकानदारांवर कडक कारवाई होणारच!

- **शिवराम मुंडे**, तालुका कृषी अधिकारी


(छाया : विजय होकर्णे)

नांदेड शहरालगतच्या लिंबगाव रस्त्याच्या कडेला दरवर्षीप्रमाणे यंदाही गुलमोहराने आपला लालभडक साज चढवला आहे. उन्हाच्या तीव्र झळा, रखरखते रस्ते आणि कोरडी धरतीअशा वातावरणातही हा वृक्ष जणू निसर्गाचा उत्सवच साजरा करताना दिसतो. गुलमोहराचे वैशिष्ट्य म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसांत त्याचा होणारा बहर.मार्च ते जून या कालावधीत पानांपेक्षा फुलांनी भरलेला हा वृक्ष निसर्गप्रेमींना आणि छायाचित्रकारांना नेहमीच आकर्षित करतो.

# मुखेड तहसीलदार पदाचा कार्यभार धनंजय राऊत यांच्याकडे

मुखेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा परीक्षा २०२३ अंतर्गत निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकाऱ्यांना प्रशिक्षणाचा भाग म्हणून स्वतंत्र तहसीलदार पदाचा कार्यभार देण्याचे आदेश विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहेत.

या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थी उप-जिल्हाधिकारी धनंजय रामदास राऊत यांची मुखेड येथे तहसीलदार म्हणून प्रशिक्षणासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना दि.१८ मे २०२६ ते २६ जून २०२६ या कालावधीत सहा आठवड्यांसाठी स्वतंत्र कार्यभार देण्यात येणार आहे. राज्य सेवा परीक्षा २०२३ मधून निवड झालेल्या अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभाराचा हा भाग असून संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष प्रशासनाचा अनुभव मिळावा हा उद्देश असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.


## जाहिर निवेदन

सर्व जनतेस या जाहीर निवेदनाद्वारे कळविण्यात येते कि,मौ.हळदवाढवणा (दापका राजा) पाझर तलाव क्र.८ ता.जळकोट जि.लातूर येथील संपादित जमीनीचे थेट सरळ खरेदी-विक्री व्यवहार महाराष्ट्र शासनाच्या वतीने व मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्या मार्फत खाजगी वाटाघाटीने व्यवहार करण्यात येत आहे.

तरी सदरील जमिनीवर जर कुणाचा बोजा, कर्ज, तारण, गहाण, वारस, विक्री करार, हस्तांतर, चोळी बांगडी, भाऊबंद, इतर अधिकार असल्यास खालील पत्यावर सात दिवसाच्या आत कागदपत्रावर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**संपादीत जमीनीचे गट नंबर व जमीन मालकाचे नाव**

| अ.क्र. | गट नंबर | खरेदी करावयाचे क्षेत्र | | | भूधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | पोट खराब | संपादन करावयाचे क्षेत्र | एकूण क्षेत्र हे.आर | |
| १ | ४०७ | ०.०० | ०.३० आर. | ०.३० आर. | पवार श्रीराम भुजंगराव |
| २ | ४०७ | ०.०० | ०.३० आर. | ०.३० आर. | पवार उत्तम भुजंगराव |
| ३ | ४०७ | ०.०० | ०.३० आर. | ०.३० आर. | पवार विनायक भुजंगराव |
| ४ | ४०७ | ०.०० | ०.३० आर. | ०.३० आर. | पवार विलास भुजंगराव |
| ५ | ४०७ | ०.०० | ०.५१ आर. | ०.५१ आर. | पवार शिवाजी खेमाजी |
| | | एकूण क्षेत्र | १.७१ हे.आर. | १.७१ हे.आर. | |

स्वाक्षरित/-
**उप-विभागीय अभियंता**
ग्रा.पा.पू.(जि.प.)
उप-विभाग जळकोट

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता**
ल.पा.पा.पू.विभाग
जि.प.लातूर

स्वाक्षरित/-
**उप विभागीय अधिकारी**
देगलूर

जिमाका/नां/जाहिरात/२०/२०२६/२०२७


# वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वेमार्गाला माहूर-किनवट मार्गे आदिलाबादची जोडणी द्या-खा.धानोरकर



माहूर/प्रतिनिधी-शेजारच्या आर्णी-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाच्या खा.प्रतिभा धानोरकर यांनी वर्धा-यवतमाळ-नांदेड या सुरू असलेल्या रेल्वेमार्गाला आर्णी मार्गे माहूर, किनवट ते आदिलाबाद रेल्वे लाईनशी जोडणी करण्यात यावी, अशी मागणी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. हा प्रस्ताव विदर्भ आणि दक्षिण भारताला जोडणारा महत्त्वपूर्ण पर्यायी रेल्वे मार्ग ठरू शकतो, असे त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

खा.धानोरकर यांनी रेल्वेमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वेमार्ग आर्णी, माहूर, किनवट मार्गे आदिलाबादपर्यंत विस्तारित झाल्यास नागपूर-वर्धा परिसरातून थेट दक्षिण भारताकडे जाण्यासाठी कमी अंतराचा व अधिक सोयीस्कर रेल्वे मार्ग उपलब्ध होईल. यामुळे प्रवाशांचा वेळ वाचण्यासोबतच माल वाहतुकीलाही मोठी चालना मिळेल. महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांमधील व्यापार व आर्थिक संबंध अधिक मजबूत होतील, असेही त्यांनी नमूद केले. या रेल्वेमार्गामुळे धार्मिक आणि पर्यटन क्षेत्रालाही मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आर्णी येथील बाबा कँबलपोश दर्गा, दाभरी येथील ओंकारेश्वर मंदिर, श्री रेणुका माता मंदिर, दत्तात्रेय मंदिर, अनुसया माता मंदिर, सहस्रकुंड धबधबा आणि पैनगंगा अभयारण्य यांसारखी प्रसिद्ध धार्मिक व पर्यटनस्थळे थेट रेल्वे नकाशावर येतील. त्यामुळे यात्रेकरू आणि पर्यटकांची संख्या वाढून स्थानिक रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळेल. याशिवाय, परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल नागपूर, हैदराबाद आणि आदिलाबाद सारख्या मोठ्या बाजार पेठांमध्ये कमी खर्चात पोहोचविणे शक्य होईल. दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य आणि वैद्यकीय सेवांसाठी नागपूर व हैदराबाद येथे जाणेही अधिक सुलभ होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या रेल्वेमार्गासाठी तांत्रिक व भौगोलिक सर्वेक्षण तातडीने करण्यात यावे आणि या ऐतिहासिक प्रकल्पाला लवकर मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. खा.प्रतिभा धानोरकर यांनी केलेल्या मागणीप्रमाणेच हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर तसेच तेलंगणातील आदिलाबादचे खा.नागेश घोडाम यांनीही संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या माहूर तीर्थक्षेत्राला रेल्वेने जोडण्यासाठी हिंगोलीच्या खासदारांनी विशेष पुढाकार घ्यावा, अशी मागणी भाविक व नागरिकांकडून होत आहे.


## प्रवेश देणे चालू आहे

**जय मल्हार शिक्षण प्रसारक मंडळ पिंपरखेड ता.हदगाव संचलित**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह पिंपरखेड हदगाव ता.हदगाव जि.नांदेड**

**(मान्य संख्या - २४)**

सन २०२६ - २०२७ या वर्षाकरिता इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अनुदानीत वस्तीगृहात खालील जाती निहाय टक्केवारी प्रमाणे प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जाती निहाय | टक्केवारी | प्रवेश संख्या |
|---|---|---|---|
| १) | एस.सी.(अनुसुचित जाती) | ६७ % | १५ |
| २) | एस.टी.(अनुसुचित जमाती) | १४ % | ०२ |
| ३) | एन.टी.(वि.जा.भ.जमाती) | १७ % | ०२ |
| ४) | विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.) | ०२ % | ०१ |
| ५) | इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) | १५ % | ०३ |
| ६) | खुला (ओपन) | ०५ % | ०१ |
| | एकूण | १२० टक्के | २४ |

**वैशिष्ट्य :-** सुसज्ज इमारत, जेवणाची उत्तम सोय, पुरेशी विद्युत व्यवस्था, विनामुल्य प्रवेश, विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष.

**टिप :-**सर्व विद्यार्थ्यांना मोफत पत्राची पेटी, ताट, तांब्या, गादी, सतरंजी ब्लँकेट देण्यात येईल.

-: संपर्क :-

**अध्यक्ष** **अधिक्षक**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह पिंपरखेड हदगाव ता.हदगाव जि.नांदेड**

**संपर्क :- ८८८८११८७११, ९४२०४१७९२४**


पान १ वरुन

### पंतप्रधान मोदी-गृहमंत्री...

केले. भरतगंज बाजारात नागरिकांची गर्दी पाहून राहुल गांधी यांनी आपला ताफा थांबवत लोकांशी हस्तांदोलन केले. नागरिकांनी त्यांचे फुलांच्या गुच्छाने स्वागत केले.दरम्यान, राहुल गांधी यांच्या अमेठी दौऱ्यापूर्वी स्थानिक खासदार किशोरी लाल शर्मा यांच्या विरोधात पोस्टरबाजी करण्यात आली. दोन वर्षांत काय केले? असा सवाल करणाऱ्या पोस्टर्समध्ये अमेठीच्या माजी खासदार स्मृती इराणी यांनी पाच वर्षांत केलेल्या विकासकामांचा उल्लेख करण्यात आला आहे.

### नीट पेपरफुटी प्रकरणी...

मागण्यांसाठी विद्यार्थी कृती समितीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी एका शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले. या आंदोलनात मुन्तजीब देशमुख, तुषार देशमुख, सुनील कदम, प्रबुद्ध चिट्टे, मोहम्मद जाहेर, कैलास वाघमारे, अंकु सावते, उसामा खतिब, फरहान देशमुख, अझहर शेख यांच्यासह इतर पदाधिकारी, विद्यार्थी सहभागी झाले होते.

### पुन्हा सांगतो;राहुल गांधी...

बाजूला ठेवले पाहिजेत. त्यांनी शरद पवार यांच्या वक्तव्याचे समर्थन करताना सांगितले की, पंतप्रधान मोदी यांच्या परदेश दौऱ्यांमुळे अनेक देशांशी महत्त्वाचे करार झाले आहेत. त्यामुळे पुढील दहा ते वीस वर्षांचे भारताचे भविष्य अधिक मजबूत होणार आहे. त्यामुळे शरद पवारांना राग आला तरी पुन्हा सांगतो राहुल गांधी हे रिजेक्टेड माल आहेत, असा आरोप त्यांनी केला.

### अशोक खरातला आता...

वापरण्यात आली, याचा तपास सुरू असल्याचे ईडीने न्यायालयात स्पष्ट केले. ईडीच्या तपासात समता पतसंस्थेमध्ये ३४ बेनामी एफडी खाती उघडण्यात आल्याचेही उघड झाले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४